**पी. आर. पोटे पाटील एज्युकेशन अँड वेल्फेअर ट्रस्ट, अमरावती संचालित**

**पी. आर. पोटे. पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती**

( डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्न )

# राष्ट्रीय सेवा योजना

# वार्षिक अहवाल

## २०२० - २०२१

# पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय ,अमरावती

# वार्षिक अहवाल

## २०२० - २०२१

### ❖ शेंद्रिय शेती तंत्रज्ञान कार्यशाळा– ०४ जून २०२०






**पोटे कृषी महाविद्यालयात 'सेंद्रिय शेती तंत्रज्ञान'कार्यशाळा**

- सेंद्रिय शेतीबद्दल समज व गैरसमज केले विषद
- २३ जिल्ह्यातून शेकडो विद्यार्थी व शेतकऱ्यांची ऑनलाईन हजेरी

**अमरावती** ▪ शहर प्रतिनिधी


पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावतीद्वारा ४ जून रोजी आयोजित 'सेंद्रिय शेती तंत्रज्ञान' कार्यशाळा पार पडली. कोरोना महामारीमुळे सुरू असलेल्या टाळेबंदीदरम्यान शेतकऱ्यांपर्यंत शास्त्रीय सेंद्रिय शेती तंत्रज्ञान पोहोचण्याच्या व त्यांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने कृषी महाविद्यालयाद्वारा ही ऑनलाईन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेस डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील वरिष्ठ सेंद्रिय शेती संशोधन शास्त्रज्ञ डॉ.ए.एन. पसलावार यांनी शास्त्रीयदृष्ट्या सेंद्रिय शेती तंत्रज्ञान व त्याचे फायदे या विषयावर मार्गदर्शन केले. विभागीय सोयाबीन संशोधन केंद्र, अमरावती येथील शास्त्रज्ञ डॉ.अनिल ठाकरे, डॉ.राजीव धावडे व यांनी सेंद्रिय शेतीमध्ये वापरावयाच्या निविष्ठा याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच इफ्कोचे निवृत्त अधिकारी सुरेश रोडे यांनी सेंद्रिय शेतीबद्दलचे समज व गैरसमज याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांच्या शंकेचे समाधान केले. सेंद्रिय शेती तंत्रज्ञान या कार्यशाळेचे प्रस्ताविक पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय अमरावतीचे प्राचार्य डॉ.सुभाष देशमुख यांनी केले, तर उपस्थित शास्त्रज्ञांचे व सहभागी सदस्यांचे ओळख व स्वागत महाविद्यालयाचे उपप्राचार्य राजेश खाडे यांनी केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा.राहुल कळसकर यांनी केले, तर ऑनलाईन कार्यशाळेसाठी तांत्रिक साहाय्य महात्मा गांधी मिशनच्या, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. सोनम काळे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. नितेश चौधरी यांनी केले. ऑनलाईन कार्यशाळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कृषी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापिका तसेच शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी मेहनत घेतली. या ऑनलाईन कार्यशाळेसाठी झूम ॲप माध्यमातून विदर्भासह महाराष्ट्राच्या २३ जिल्ह्यातून शेतकरी व विद्यार्थी यांनी हजेरी लावली. सदरील कार्यशाळेचा फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून देखील शेतकऱ्यांनी फायदा घेतला. या ऑनलाईन कार्यशाळेचे उद्घाटन डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाचे कुलगुरू डॉ.व्ही.एम.भाले यांच्याहस्ते झाले. पी.आर.पोटे पाटील शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते, तसेच पी.आर.पोटे पाटील शैक्षणिक संकुलाचे उपाध्यक्ष दिलीप निंभोरकर उपस्थित राहून कार्यशाळेस शुभेच्छा दिल्या व यापुढेही अशा कार्यशाळा आयोजित कराव्यात, अशी इच्छा व्यक्त केली.

पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती द्वारा ४ जून रोजी सेंद्रिय शेती तंत्रज्ञान या विषयावर ऑनलाईन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील वरिष्ठ सेंद्रिय शेती संशोधन शास्त्रज्ञ डॉ. ए. एन. पसलावार यांनी शास्त्रीय दृष्ट्या सेंद्रिय शेती तंत्रज्ञान व त्याचे फायदे या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित इतर शास्त्रज्ञांनी सुद्धा सेंद्रिय शेतीमध्ये वापरायच्या निविष्ठा याबद्दल मार्गदर्शन केले व शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष देशमुख यांनी केले तर उपस्थित शास्त्रज्ञांची व सहभागी सदस्य यांची ओळख देखील करून दिली व स्वागत महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. राजेश खाडे यांनी केले. कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा. राहुल कळसकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. नितेश चौधरी यांनी केले ऑनलाइन कार्यशाळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कृषी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापिका तसेच शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी मेहनत घेतली. या ऑनलाइन कार्यशाळेसाठी झुम ॲप माध्यमातून महाराष्ट्राच्या २३ जिल्ह्यातून शेतकरी व विद्यार्थी यांनी हजेरी लावली होती.

## ❖ जागतिक पर्यावरण दिन:-५ जून २०२०



❖ पर्यावरण बदलाचे संकट करोना पेक्षा कैक पटींनी मोठे आहे याची जाणीव करून देण्यासाठी पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे जागतिक पर्यावरण दिन आभासी पद्धतीने साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमात महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत असताना पर्यावरणाचे आरोग्य राखले गेले तरच पुढची पिढी चांगले आयुष्य जगू शकेल आणि त्यासाठी प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे आहे हे पटवून दिले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले.

## ❖ पावसाळ्यातील पशुधनाची निगा, दुग्ध व्यवसायातील समस्या व पशुसंवर्धन विभागाच्या योजना- १० जून २०२०



पी.आर.पोटे पाटील एज्युकेशन अँड वेलफेअर ट्रस्ट ,अमरावती संचालित
पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय,अमरावती
(डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ ,अकोला संलग्न)
व
पशुसंवर्धन विभाग,महाराष्ट्र शासन
यांच्या संयुक्त विदयमाने आयोजित

**ऑनलाईन कार्यशाळा**

**"पावसाळ्यातील पशुधनाची निगा,दुग्ध व्यवसायातील समस्या व पशुसंवर्धन विभागाच्या योजना"**

**दि.१० जून २०२० स.११ वा.**

नमस्कार शेतकरी बंधूंनो,
पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय अमरावती व पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन यांच्य सयुक्त विद्यमाने 'पावसाळयातील पशुधनाची निगा,दुग्ध व्यवसायातील समस्या व पशुसंवर्धन विभागाच्या योजना' या ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन झूम मिटींग सॉफ्टवेअरच्या माध्यमातून करण्यात येत असुन या संवादामधध्ये आपणास तज्ञाचे मार्गदर्शन लाभणार आहे.

* कार्यक्रमाचे अध्यक्ष *
मा.श्री.प्रविणभाऊ पोटे पाटील
अध्यक्ष,पी.आर.पोटे.पाटील एज्यु.अँड वेलफेअर ट्रस्ट अमरावती

* संस्थेबाबत दोन शब्द *
मा.श्री.दिलीपभाऊ निंभोरकर
उपाध्यक्ष,पी.आर.पोटे.पाटील एज्यु.अँड वेलफेअर ट्रस्ट अमरावती

* प्रास्ताविक *
मा.डॉ एस.एन.देशमुख
प्राचार्य,पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय,अमरावती

* प्रमुख वक्ते ओळख व स्वागत *
प्रा.राजेश शे. खाडे
उपप्राचार्य,पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय,अमरावती

* प्रमुख मार्गदर्शक व विषय *

पावसाळ्यातील पशुधनाचे आजार व व्यवस्थापन
मा.डॉ.आर.एस.पेठे
सहा.आयुक्त,जिल्हा पशुवैद्यकिय सर्व चिकीत्सालय,अमरावती

दुग्ध व्यवसायातील समस्या व उपाय
मा.डॉ.मोहन गोहत्रे
जिल्हा उपायुक्त,पशुसंवर्धन विभाग,अमरावती

पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना,
पशुसंवर्धन व ग्रामिण अर्थव्यवस्था
मा.डॉ.विजय एस.राहाटे
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,जि.प.अमरावती

* सुत्रसंचालन *
प्रा.राहुल कळसकर
सहा.प्राध्यापक, पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय,अम.

* तांत्रीक सहाय्य *
प्रा.नितेश चौधरी
सहा.प्राध्यापक, पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय,अम.

* आभार प्रदर्शन *
प्रा.उदय देशमुख
सहा.प्राध्यापक, पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय,अम.

* विशेष सहाय्य *
डॉ.अर्चना त्रिपाठी,डॉ.लिना शिंदे,प्रा.श्वेता देशमुख,
प्रा.मिरा इंगोले,प्रा.श्वेता गावंडे,प्रा.शितल सोनुकले,प्रा.दिपाली निंबाळकर,
प्रा.मोनाली पोटे व प्राध्यापकेतर कर्मचारी पी.आर.पोटे.पाटील कृषी महाविद्यालय, अम.

सदर कार्यक्रम हा Zoom App वर ऑनलाईन पध्दतीने आयोजित केलेला आहे.

MAULI GRAPHICS©



**पोटे कृषी महाविद्यालयात दुग्धव्यवसाय कार्यशाळा**

अमरावती ■ नगर प्रतिनिधी

पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने १० जून रोजी 'पावसाळ्यातील पशुधनाची निगा, दुग्ध व्यवसायातील समस्या व पशुसंवर्धन विभागाच्या योजना' या विषयावर आयोजित कार्यशाळा पार पडली. शेतकऱ्यांपर्यंत पावसाळ्याच्या सुरुवातीला पशुधनाची निगा, दुग्ध व्यवसायातील अडचणी व त्यावरील उपाय तसेच पशुपालकांसाठी पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना यांची माहिती पोहोचण्याच्या व त्यांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने कृषी महाविद्यालयाद्वारा ही ऑनलाईन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या ऑनलाईन कार्यशाळेचे उद्घाटन पी. आर. पोटे पाटील शैक्षणिक संकुलाचे उपाध्यक्ष दिलीप निंभोरकर यांच्याहस्ते झाले.

पी. आर. पोटे पाटील शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कार्यशाळेत डॉ. आर. एस. पेठे, सहायक आयुक्त, जिल्हा पशुवैद्यकीय चिकित्सालय, अमरावती यांनी पावसाळ्यातील पशुधनाचे आजार व व्यवस्थापन या विषयावर, तर डॉ. मोहन गोहत्रे, जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन विभाग, अमरावती यांनी दुग्ध व्यवसायातील समस्या व उपाय या विषयावर मार्गदर्शन केले. पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद) अमरावतीचे डॉ. विजय राहाटे यांनी पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना तसेच पशुसंवर्धन व ग्रामीण अर्थव्यवस्था या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. पशुसंवर्धन विभागाचे पशुधन विकास अधिकारी, डॉ. सुधीर जिरापुरे यांनी यांनी कुक्कुटपालन व्यवसायातील संधी व शास्त्रीयदृष्ट्या कुक्कुटपालन तंत्रज्ञान या विषयावर, तर कृषी विज्ञान केंद्र, धुळे येथील विषय विशेषज्ञ डॉ. धनराज चौधरी यांनी चारा व्यवस्थापन व पशुधनाचे महत्त्व या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यशाळेसाठी मार्गदर्शन करणाऱ्या सर्व तज्ज्ञांनी उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांच्या शंकेचे समाधान केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय अमरावतीचे प्राचार्य डॉ. सुभाष देशमुख यांनी केले, तर उपस्थित तज्ज्ञांचे व सहभागी सदस्यांचे ओळख व स्वागत महाविद्यालयाचे उपप्राचार्य राजेश खाडे यांनी केले.


❖ महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने १० जून रोजी पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती येथील पशुसंवर्धन विभागाअंतर्गत पावसाळ्यातील पशुधनाची निगा, दुग्ध व्यवसायातील समस्या व पशुसंवर्धन विभागाच्या योजना या विषयावर ऑनलाइन पद्धतीने कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या ऑनलाईन कार्यशाळेचे उद्घाटन पी. आर. पोटे पाटील शैक्षणिक संकुल अन्नाचे उपाध्यक्ष दिलीप निंभोरकर सर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील होते. कार्यशाळेमध्ये जिल्हा पशुवैद्यकीय चिकित्सालय येथील सहाय्यक आयुक्त मा. डॉ. आर. एस. पेठे व जिल्हा उपआयुक्त मा. डॉ. मोहन गोहत्रे यांचे  मार्गदर्शन लाभले. त्यांनी चारा व्यवस्थापन व पशुधनाचे महत्त्व या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# ❖ जागतिक योग दिन :- २१ जून २०२०











❖ पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे २१ जून रोजी जागतिक योग दिवस आभासी पद्धतीने साजरा करण्यात आला त्यानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य आणि उपप्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून दिले या कार्यक्रमासाठी महात्मा गांधी मिशनच्या कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉक्टर सोनम काळे यांनी विद्यार्थ्यांकडून विविध योगमुद्रा करून घेतल्या व योगासनाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तसेच स्वयंसेवक यांनी मदत केली.

## ❖ कृषि दिन कार्यक्रम (कृषि संजीवनी सप्ताह) – ०१ जुलै ते ०७ जुलै २०२०




### पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयात ऑनलाईन कृषी सप्ताह

**अमरावती ▪ प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतिप्रीत्यर्थ पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय अमरावती येथे २६ जून ते १ जुलै या कालावधीत कृषी सप्ताह आयोजित करण्यात आला. उपरोक्त काळात विविध विषयांना अनुसरून ऑनलाईन निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, व्हिडिओ मेकिंग अँण्ड एडिटिंग, टाकाऊपासून टिकाऊ, कृषिक्षेत्रातील नावीन्यपूर्ण संशोधन तंत्रज्ञान, पोस्टर, छायाचित्र इ. अशा विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये राज्यातील विविध कृषी महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सहभाग दर्शवला. त्याच दरम्यान विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्तींचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आली. [illegible] प्रमुख्याने इंजि. अश्विन [illegible] (टी. सी. एस.) यांचे अभ्यासेतर उपक्रमात सहभाग, डॉ. अंकुश बाजड यांचे आंतरराष्ट्रीय फुलशेती बाजारपेठ व भारतातील संधी, डॉ. सखाराम पवळ (तालुका कृषी अधिकारी), सुबोध दांडगे (ए.सी.पी), ऋषभ पडार (कृषी परिक्षेत्र अधिकारी) यांचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाबाबत ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कृषी सप्ताहाची सांगता १ जुलै म्हणजेच कृषिदिन साजरा करून करण्यात आली. कृषिदिनाच्या मुख्य कार्यक्रमात पी.आर. पोटे पाटील एज्यु. अँण्ड वेलफेअर ट्रस्टचे अध्यक्ष प्रवीण पोटे, उपाध्यक्ष दिलीप निंबोरकर यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या व ऑनलाईन उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकपर भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. देशमुख यांनी कार्यक्रमाचा उद्देश विशद करून माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या कृषिक्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाबाबत माहिती दिली. महाविद्यालयाचे उपप्राचार्य राजेश खाडे यांनी कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन, तर विद्यार्थिनी कु. ऋतुजा इंगळे हिने सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नीतेश बा. चौधरी, प्रतीक इंगळे, उपाध्यक्ष ऋतुजा इंगळे, सचिव साक्षी अवचट, कोषाध्यक्ष हिमांशू दाऊतपुरे व इतर सभासद व प्राध्यापक वृंद यांनी अथक परिश्रम घेतले.

P.R.Pote (Patil)Education & Welfare Trust's,Amravati
P.R.Pote Patil College Of Agriculture,Amravati
(Affiliated Dr P.D.K.V,Akola)
Student Forum Committee,NSS(National Service Scheme)

Organised

## Agriculture Week Celebration 2020

26 June to 1 July

Online

## VIDEO & EDITING COMPETITION

**Prize Worth**
- 1st Prize Rs-1001
- 2nd Prize Rs-501

All Prticipants Will Get Certificate

**TOPICS**

1)Agriculture 2)Animals
3)Fertilizers 4)pest
5)insects 6)crpos



Submit this Video up to 29 June with your names

**COMPETITION COORDINATOR**

- Yogesh parwatkar - 7083136768
- Tanvi kakad - 9552635247
- Snehal jadhao - 7517507646

**ORGANIZER**

Dr.S.N.Deshmukh, Principal, P.R.P.P.C.A,Amravati
R.S.Khade, Vice-Principal, P.R.P.P.C.A,Amravati
N.B.Choudhari, NSS - Coordinator, P.R.P.P.C.A,Amravati
Pratik S. Ingale, President,Student Forum (P.R.P.P.C.A)
Rutuja G.Ingale, Vice-President,Student Forum (P.R.P.P.C.A)

All Students Forum Committee,NSS Students
P.R.Pote Patil College Of Agriculture College,Amravati

---

P.R.Pote (Patil)Education & Welfare Trust's,Amravati
P.R.Pote Patil College Of Agriculture,Amravati
(Affiliated Dr P.D.K.V,Akola)
Student Forum Committee,NSS(National Service Scheme)

Organised

## Agriculture Week Celebration 2020

26 June to 1 July

Online

## ESSAY WRITING COMPETITION

**Prize Worth**
- 1st Prize Rs-1001
- 2nd Prize Rs-501

All Prticipants Will Get Certificate

**TOPICS**

1) Impact of covid-19 on food and agriculture sector of India.
2)How to double farmers income upto 2022.
3)Role of woman in Indian agriculture.
4)Impact of climate change on Indian agriculture.



Submit this Essay (PDF) up to 29 June with your names

**COMPETITION COORDINATOR**

- Gaurav Ladke - 9146805812
- Sneha Pradhan - 8390528963
- Divya Marotkar -9604404840

**ORGANIZER**

Dr.S.N.Deshmukh, Principal, P.R.P.P.C.A,Amravati
R.S.Khade, Vice-Principal, P.R.P.P.C.A,Amravati
N.B.Choudhari, NSS - Coordinator, P.R.P.P.C.A,Amravati
Pratik S. Ingale, President,Student Forum (P.R.P.P.C.A)
Rutuja G.Ingale, Vice-President,Student Forum (P.R.P.P.C.A)

All Students Forum Committee,NSS Students
P.R.Pote Patil College Of Agriculture College,Amravati

---

P.R.Pote (Patil)Education & Welfare Trust's,Amravati
P.R.Pote Patil College Of Agriculture,Amravati
(Affiliated Dr P.D.K.V,Akola)
Student Forum Committee,NSS(National Service Scheme)

Organised

## Agriculture Week Celebration 2020

26 June to 1 July

Online

## PPT & POSTER PRESENTATION COMPETITION

**Prize Worth**
- 1st Prize Rs-1001
- 2nd Prize Rs-501

All Prticipants Will Get Certificate

**TOPICS**

1) Recent Technologies In Agriculture



Submit this PPT nd Poster up to 29 June with your names

**COMPETITION COORDINATOR**

- Pallavi Gedam - 9623295037
- Vaishnavi Shirbhate - 7447664825
- Pranav Urkude - 8956418833

**ORGANIZER**

Dr.S.N.Deshmukh, Principal, P.R.P.P.C.A,Amravati
R.S.Khade, Vice-Principal, P.R.P.P.C.A,Amravati
N.B.Choudhari, NSS - Coordinator, P.R.P.P.C.A,Amravati
Pratik S. Ingale, President,Student Forum (P.R.P.P.C.A)
Rutuja G.Ingale, Vice-President,Student Forum (P.R.P.P.C.A)

All Students Forum Committee,NSS Students
P.R.Pote Patil College Of Agriculture College,Amravati

---

P.R.Pote (Patil)Education & Welfare Trust's Group Of Institutions
P.R.Pote Patil College Of Agriculture,Amravati
(Affiliated Dr P.D.K.V,Akola)
Student Forum Committee,NSS(National Service Scheme)

Organised

## Agriculture Week Celebration 2020

26 June to 1 July

## DIGITAL PHOTOGRAPHY COMPETITION

**Prize Worth**
- 1st Prize Rs-1000
- 2nd Prize Rs-500

All Prticipants Will Get Certificate

We are Glad to inform you that Student's forum And NSS of PRPPCOA Arrange online Digital Photography competition on the occasion of Agriculture Day and celebrating Agricultural week.



**TOPICS**

1)Natural Beauty
2)Agricultural Activities.

**COMPETITION COORDINATOR**

- Himanshu Dautpure - 8999656704
- Rashmi Dhage - 9579607599
- Sarang khode - 9763185972
- Shubham kadam - 8605606746

**ORGANISER**

Pratik S. Ingale, President,Student Forum (P.R.P.P.C.A)
Rutuja G.Ingale, Vice-President,Student Forum (P.R.P.P.C.A)

All Students Forum Committee,NSS Students
P.R.Pote Patil College Of Agriculture College,Amravati

---

P.R.Pote (Patil)Education & Welfare Trust's,Amravati
P.R.Pote Patil College Of Agriculture,Amravati
(Affiliated Dr P.D.K.V,Akola)
Student Forum Committee,NSS(National Service Scheme)

Organised

## Agriculture Week Celebration 2020

26 June to 1 July

Online

## DRAWING COMPETITION

**Prize Worth**
- 1st Prize Rs-1001
- 2nd Prize Rs-501

All Prticipants Will Get Certificate

**TOPICS**

1)Food safety Issues
2)Agriculture in the Pandemic 2020
3)Innovative Agriculture



Submit this Drawing Sheet up to 29 June with your names

**COMPETITION COORDINATOR**

- Sakshi Awchat - 8483051164
- Rutuja Ingale - 7709266895
- Pratik D. Ingale - 9960180984

**ORGANIZER**

Dr.S.N.Deshmukh, Principal, P.R.P.P.C.A,Amravati
R.S.Khade, Vice-Principal, P.R.P.P.C.A,Amravati
N.B.Choudhari, NSS - Coordinator, P.R.P.P.C.A,Amravati
Pratik S. Ingale, President,Student Forum (P.R.P.P.C.A)
Rutuja G.Ingale, Vice-President,Student Forum (P.R.P.P.C.A)

All Students Forum Committee,NSS Students
P.R.Pote Patil College Of Agriculture College,Amravati

---

P.R.Pote (Patil)Education & Welfare Trust's,Amravati
P.R.Pote Patil College Of Agriculture,Amravati
(Affiliated Dr P.D.K.V,Akola)
Student Forum Committee,NSS(National Service Scheme)

Organised

## Agriculture Week Celebration 2020

26 June to 1 July

Online

## BEST FROM WASTE COMPETITION

**Prize Worth**
- 1st Prize Rs-1001
- 2nd Prize Rs-501

All Prticipants Will Get Certificate

**TOPICS**

1) Use of household and agrowaste material.



Submit this submit photograph with it's name and raw material used up to 29 June with your names

**COMPETITION COORDINATOR**

- Sandip shanware - 9730386437
- Bhavana kale - 9921591799
- Pratik D.Ingale - 9960180984

**ORGANIZER**


Dr.S.N.Deshmukh, Principal, P.R.P.P.C.A,Amravati
R.S.Khade, Vice-Principal, P.R.P.P.C.A,Amravati
N.B.Choudhari, NSS - Coordinator, P.R.P.P.C.A,Amravati
Pratik S. Ingale, President,Student Forum (P.R.P.P.C.A)
Rutuja G.Ingale, Vice-President,Student Forum (P.R.P.P.C.A)

All Students Forum Committee,NSS Students
P.R.Pote Patil College Of Agriculture College,Amravati

❖ महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतरावजी नाईक यांच्या जयंती प्रित्यर्थ पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे २६ जून ते १ जुलै या कालावधीत कृषि सप्ताह आयोजित करण्यात आला. या काळात विविध विषयांना अनुसरून आभासिपद्धतीने निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, व्हिडिओ मेकिंग अँड एडिटिंग, टाकाऊ पासून टिकाऊ, कृषी क्षेत्रातील नावीन्यपूर्ण संशोधन तंत्रज्ञान, पोस्टर, छायाचित्र इत्यादी अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले, यामध्ये राज्यातील विविध कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सहभाग नोंदवला तसेच या कृषि साप्ताहादरम्यान विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तींचे मार्गदर्शन पर व्याख्यान देखील आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन देशमुख यांनी कार्यक्रमाचा उद्देश विशद केला. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यकारी अधिकारी प्रा. नितेश चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले.

## ❖ जागतिक लोकसंख्या दिन :- ११ जुलै २०२०




❖ जगभरात दरवर्षी ११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने पी. आर. पोटे कृषि महाविद्यालय अमरावती येथे जागतिक लोकसंख्या दिवस साजरा केला. या वेळेस कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. एस. एन. देशमुख यांनी लोकसंख्यावाढीमुळे होणाऱ्या समस्यावर लक्षवेधले व त्यावर विचारमंथन केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी नितेश चौधरी व राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्वस्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

## ❖ तंबाखू व्यसनमुक्ती सामुदायिक शपथ कार्यक्रम : - ११ जुलै २०२०






❖ पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती येथे दिनांक ११ जुलै 2020 रोजी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत तंबाखू व्यसनमुक्ती सामुदायिक शप्पथ कार्यक्रम आभासी पद्धतीने झूम वर घेण्यात आला. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य यांनी तंबाखू मुळे मानवी शरीरावर होणारे वाईट परिणामाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच आपण सर्वजण मिळून जर या व्यसनाधीनतेच्या विरुद्ध यलगार केला आणि तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनाला विरोध केला तर नक्कीच भारतीय नागरिकांचे व भारताचे आरोग्य स्वस्त आणि बलशाली होण्यास मदत होईल हीच पुढील पिढी करून

अपेक्षा व्यक्त केली. सदर कार्यक्रमात महाविद्यालयाचे विद्यार्थी यांनी आपले मनोगत अतिशय उत्तम प्रकारे व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राचार्य नितेश चौधरी व राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## आंतरराष्ट्रीय युवा दिवस :- १२ ऑगस्ट २०२०






- पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे आंतरराष्ट्रीय युवा दिवस १२ ऑगस्ट २०२० रोजी आभासी पद्धतीने साजरा करण्यात आला दरवर्षी यानिमित्ताने युवकांशी निगडीत विशिष्ट पैलूंवर चर्चा घडवून आणली जाते या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालायाचे प्राचार्य यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने युवक हा समाजात बदल घडून आणण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे आणि या भूमिकेबाबत चर्चा होणे आणि त्या दिशेने युवकांचा सहभाग वाढवणे तेवढेच महत्त्वाचे आहे हे पटवून दिले तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

## ❖ स्वातंत्र्य दिवस :- १५ ऑगस्ट २०२०.





❖ पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय अमरावती येथे १५ ऑगस्ट म्हणजे स्वातंत्र्य दिवस साजरा करण्यात आला. ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या सातवा सत्रातील विद्यार्थ्यांनी रावे कार्यक्रमांतर्गत निवड केलेल्या गावांमधील ग्रामपंचायत व शाळा या ठिकाणी १५ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात आलेल्या स्वातंत्र्य दिन कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. तसेच ऑनलाईन पद्धतीने या दिवशी चे महत्व प्राचार्य आणि विद्यार्थ्यांच्या भाषणांमधून विविध प्रकारे मांडण्यात आले.

## ❖ गाजर गवतनिर्मुलन सप्ताह :- १६ ते २२ ऑगस्ट २०२०.




❖ गाजरगवताविषयी जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने गाजर गवत जागरूकता कार्यक्रम डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या आदेशान्वये पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय अमरावती येथे दिनांक १६ ते २२ ऑगस्ट २०२० यादरम्यान गाजर गवत निर्मूलन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक, विद्यार्थी व महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी आभासी पद्धतीने हजर होते.

## ❖ कृषी विद्यापीठाच्या शहिदांना विनम्रअभिवादन:-२० ऑगस्ट २०२०




पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालयात शहीदांना दोन मिनिटे स्तब्ध उभेराहून श्रदांजली देण्यात आली. यानिमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. देशमुख यांनी शहीदांविषयी माहिती सांगितली अकोला विद्यापीठाच्या स्थापनेसाठी शहीद नरेंद्र देशमुख, भिरुमल रिझुमल, सुरेश भडके, सुरेश कुर्हे, गजानन देवघरे, नेमीचंद गोपाल, सुरेश वानखडे, शेख रफीक यांनी आपल्या प्राणाचे बलीदान दिले. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक, इतर विद्यार्थी व महाविद्यालयाचे सर्वकर्मचारी शहिदांना श्रद्धांजली देण्यासाठी मोठ्या संख्येने आभासी पद्धतीने उपस्थित होते.


## ❖ पर्यावरण अनुकूल गणेश मूर्ती जागरूकता कार्यशाळा-२१ऑगस्ट २०२०




❖ पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा संदेश देण्यासाठी पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालयामध्ये पर्यावरण पूरक गणेश मूर्ती जागृकता कार्यशाळा आभासी पद्धतीने घेण्यात आली. एक पाऊल पर्यावरणाकडे या संकल्पनेला धरून पर्यावरणातील प्रदूषण रोखण्यासाठी शाडू मातीच्या गणेश मूर्तीची निर्मिती विद्यार्थ्यांनी स्वतः करून त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आपापल्या घरी करावी हा या कार्यक्रमाचा मागचा उद्देश होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. एस एन देशमुख यांनी पर्यावरण पूरक गणेश मूर्ती स्थापनेची महत्व व जागृकता याबद्दल आपले मत मांडले .तसेच कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख अतिथी यांनी सुद्धा आपण पर्यावरणाचे या पद्धतीने कसे संरक्षण करू शकतो हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक कार्यकारी अधिकारी प्राध्यापक नितेश चौधरी व विद्यार्थी स्वयंसेवक यांनी अथक परिश्रम केले.

## ❖ शिक्षक दिन कार्यक्रम :- ०५ सप्टेंबर २०२०




❖ शिक्षक दिन हा सर्व शिक्षकांना समर्पित असा विशेष दिवस आहे जो शिक्षकांना सन्मानित करण्यासाठी दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी साजरा करण्यात येतो तर याच दिवशी पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती येथे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन आभासी पद्धतीने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. एन. देशमुख यांनी शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व स्पष्ट केले तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या आयुष्याबद्दल अनेक शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील उपप्राचार्य श्री. राजेश खाडे खाडे यांनी आपल्या आयुष्यात आपल्या शिक्षकांची आवश्यकता आणि मूल्य समजून घेणे आवश्यक आहे हे पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन हे विद्यार्थिनींनी केले तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यकारी अधिकारी प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी परिश्रम केले.

## ❖ जागतिक साक्षरता दिवस:- ०८ सप्टेंबर २०२०





❖ पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती येथे आठ सप्टेंबर रोजी जागतिक साक्षरता दिन साजरा करण्यात आला. निरक्षर असलेल्या लोकांना साक्षरतेची संधी मिळावी म्हणून युनेस्कोच्या वतीने दरवर्षी हा सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा केला जातो. कार्यक्रमानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. देशमुख यांनी शिक्षणाचे जीवनात असलेले महत्त्व पटवून दिले. निरक्षरता हा मानवाच्या जीवनातील सर्वात मोठा अभिशाप आहे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी साक्षरता एक मुख्य आधारशिला आहे असे सांगितले. या दिनी विद्यार्थ्यांनी सुद्धा आपले मनोगत अतिशय उत्तम रित्या मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यकारी अधिकारी प्राध्यापक नितेश चौधरी व विद्यार्थी स्वयंसेवक यांनी प्रयत्न केले

## ❖ राष्ट्रीय सेवा योजना दिवस :- २४ सप्टेंबर २०२०.












❖ पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय अमरावती येथे राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे आयोजन २४ सप्टेंबर २०२० रोजी आभासी पद्धतीने करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य एस.एन. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच स्वयं शिस्तीतून देश सेवा करता येते असे सांगून त्यांनी सर्व उपस्थितांना उत्कृष्ट नागरिक बना असा सल्ला दिला .सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक निलेश चौधरी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी कार्यक्रमाला हातभार लावला.

## ❖ महात्मा गांधी जयंती -२ ऑक्टोबर २०२०




❖ पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती तसेच आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस ०२ ऑक्टोंबर २०२० मध्ये आभासी पद्धतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. देशमुख यांनी महात्मा गांधींच्या जीवनावर प्रकाश टाकला. तसेच उपप्राचार्य श्री राजेश खाडे यांनी विद्यार्थ्यांना अहिंसेचे महत्त्व पटवून दिले. सदर कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. नितेश चौधरी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवकांनी मदत केली.

## ❖ आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस :- २ ऑक्टोबर २०२०





❖ पी. आर .पोटे .पाटील कृषि  महाविद्यालय अमरावती येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती आणि आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस आभासी पद्धतीने साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. एस. एन. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना महात्मा गांधी यांच्या जीवनाचा प्रवासाबद्दल थोडक्यात माहिती दिली व तसेच विद्यार्थ्यांना अहिंसेचे महत्व पटवून दिले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. नितेश चौधरी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवकयांनी अथक परिश्रम घेतले.

## ❖ संविधान दिवस :- २६ नोव्हेंबर २०२० .




❖ पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती येथे राष्ट्रीय स्वयंसेवक यांच्या मार्फत २६ नोव्हेंबर 2020 रोजी संविधान दिवस आभासी पद्धतीने साजरा करण्यात आला .या कार्यक्रमाला अध्यक्ष लाभलेले प्राचार्य डॉ. एस. एन. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुद्धा संविधान दिवसावर आपले मत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. उदय देशमुख यांनी विद्यार्थ्यांना संविधान दिवसांचे महत्त्व पटवून दिले तसेच सोबतच काही शिक्षक यांनी सुद्धा आपले मत व्यक्त केले. सदर कार्यक्रम हा राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

## ❖ कृषिविषयक शिक्षण दिवस:- ०३ डिसेंबर २०२०.




1)Online Debate Competition : - 3rd Dec 2020 at 4.00 PM

| Sr.no | Participants Student Name | Year |
|---|---|---|
| 1 | Dhruv Kambe | 2nd |
| 2 | PrathmeshGhurde | 2nd |
| 3 | Ayush Patil | 2nd |
| 4 | Tanuja Nagpure | 2nd |
| 5 | Sakshi Dawale | 2nd |
| 6 | Himanshu Dautpure | 4th |
| 7 | PriyanshuKatkwar | 2nd |
| 8 | Pratik S Ingale | 4th |
| 9 | Namrata Kolhe | 2nd |
| 10 | MuhitMakwani | 2nd |
| 11 | Shreya Gaikwad | 2nd |
| 12 | Bhavika Raut | 2nd |
| 13 | Shradha Sadafale | 2nd |
| 14 | Ritu Patil | 2nd |
| 15 | Sahil Kale | 2nd |
| 16 | Yashwant Taware | 2nd |
| 17 | Prashant Ingale | 2nd |
| 18 | RuchitaPande | 2nd |
| 19 | PranaliGhatole | 2nd |
| 20 | Dhananjay Khapare | 2nd |
| 21 | Vashika Choudhary | 2nd |

❖Winner list :-

1st-- Ayushpatil


2nd-- PratikIngale

3rd-- HimanshuDautpure

❖ आपल्या जीवनात कृषि क्षेत्राचे महत्व पटवून देण्यासाठी पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयामध्ये 3 डिसेंबर रोजी कृषि शिक्षण दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. एन. देशमुख यांनी आपल्या जीवनात कृषिक्षेत्राचे असलेले महत्व पटवून दिले. त्यासाठी आपण भरपूर प्रमाणात झाडे लावायला हवी व त्यांचे संगोपन करायला हवे हे सांगितले. तसेच इतर विद्यार्थ्यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक कार्यकारी अधिकारी प्रा. नितेश चौधरी व विद्यार्थी स्वयंसेवक आणि परिश्रम घेतले .या दिवसा निमित्त विद्यार्थ्यांनी आपापल्या राहत्या ठिकाणी वृक्षारोपण केले.

## डॉ. पंजाबराव देशमुख जयंती :- २७ डिसेंबर २०२० .




पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दिनांक २७ डिसेंबर 2020 रोजी भाऊसाहेब डॉक्टर पंजाबराव देशमुख यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. एस. एन देशमुख यांनी भूषवले. कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी डॉक्टर पंजाबराव देशमुख यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक नितेश चौधरी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व सेवकांनी आभासी पद्धतीने कार्यक्रम आयोजित केला.

## ❖ सावित्रीबाई फुले जयंती :- ०३ जानेवारी २०२१







❖ भारतातील पहिल्या महिला शिक्षीका सावित्रीबाई फुले यांची जयंती पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती येथे ३ जानेवारी रोजी साजरी करण्यात आली. या दिवसाला अनुसरून विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांचे

आपल्या जीवनातील महत्त्व व्यक्त केले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. सावित्रीबाई फुले यांनी आपल्या जीवनात विविध हाल-अपेष्टा, कष्ट सहन करूनही स्त्रियांना शिकवण्याचे महत्वाचे कार्य हाती घेतले होते अशे मत व्यक्त केले.. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक नितीन चौधरी व सर्व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## ❖ राष्ट्रीय युवा दिवस :- १२ जानेवारी २०२१.




❖पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय, अमरावती येथे आंतरराष्ट्रीय युवा दिवस १२ जानेवारी २०२० रोजी आभासी पद्धतीने साजरा करण्यात आला दरवर्षी यानिमित्ताने युवकांशी निगडीत विशिष्ट पैलूंवर चर्चा घडवून आणली जाते या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. एस. एन देशमुख यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने युवक हा समाजात बदल घडून आणण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे आणि या भूमिकेबाबत चर्चा होणे आणि त्या दिशेने युवकांचा सहभाग वाढवणे तेवढेच महत्वाचे आहे हे पटवून दिले तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.

## ❖ नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती :- २३ जानेवारी २०२१




❖ पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती येथे 23 जानेवारी रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. तुम्ही मला रक्त द्या मी तुम्हाला आजदी देईन अशी घोषणा करणाऱ्या देशाच्या खऱ्या देशभक्ताला आदरांजली वाहण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस एन देशमुख यांनी प्रत्येक व्यक्ती हा सुभाष चंद्र बोस यांच्या सारखा कर्तृत्ववान आणि देशाविषयी निष्ठावान असावा असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय स्वयंसेवक कार्यकारी अधिकारी प्रा. नितेश चौधरी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रद्धा देशमुख यांनी केले

## ❖ प्रजासत्ताक दिवस :- २६ जानेवारी २०२१






❖ पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालयामध्ये २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम पी. आर. पोटे पाटील ग्रुप ऑफ एज्युकेशन इंस्टिट्यूशन्स मधील सर्व महाविद्यालयाचा सामूहिक कार्यक्रम होता. या दिवशी भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला वंदना देण्यात आली. तसेच भारताचे राष्ट्रगीत म्हटल्या गेले. हा दिवस आपल्या देशातील सुवर्ण दिन म्हूणन साजरा करण्यात आला. तसेच करोना चा प्रादुर्भाव लक्षात घेता सोशल डिस्टंसिंग आणि मास्क वापरून हा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

## ❖ हुतात्मा दिवस :- ३० जानेवारी २०२१

❖पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती येथे हुतात्मा दिन ३० जानेवारी २०२१ सकाळी ११ वाजता आभासी पद्धतीने घेण्यात आला. या दिवशी स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ सर्वांनी दोन मिनिटे स्तब्धता पाळून आदरांजली वाहिली. सदर कार्यक्रमात प्राचार्यांसह इतर विद्यार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यकारी अधिकारी व स्वयंसेवक यांचे मार्गदर्शन लाभले.


## ❖ शिवजयंती :- १९ फेब्रुवारी २०२१




❖ हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि अवघ्या जगाने कौतुक करावे, असे उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणजे आपल्या मातीत जन्म घेतलेले, सर्वांना आपलेसे वाटणारे, तेजस्वी, तसेच मराठी माणसाची आन बान आणि शान असलेल्या राजाधिराज महाराज छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती येथे आभासी पद्धतीने करण्यात आली. महाराष्ट्रासाठी शिवराय हे वंदनीय आणि पूजनीय होते. मराठी माणसाचे अस्तित्व त्यामुळे आजही टिकून आहे आणि या दिवशी महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी शिवरायांबद्दल व त्यांच्या कामगिरीबद्दल सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच विद्यार्थ्यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाचे आयोजन हे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले.

## ❖ संत गाडगेबाबा जयंती :- २३ फेब्रुवारी २०२१



❖ पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती येथे समाजातील अज्ञान अंधश्रद्धा भोळ्या समजुती अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले अशा गाडगे महाराजांची जयंती 23 फेब्रुवारीला ऑनलाईन पद्धतीने साजरी करण्यात आली . कार्यक्रमाला अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. एन देशमुख यांनी आपल्या व्याख्यानातून गाडगे महाराजांचे कार्य स्पष्ट केले. तसेच या दिवशी काही विद्यार्थ्यांनीसुद्धा व सुद्धा आपले विचार व्यक्त केले. त्यांच्या संपूर्ण कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. संत गाडगे महाराजांनी मध्ये होत्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन हे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यकारी अधिकारी प्राध्यापक नितेश चौधरी व व प्राध्यापिका श्रद्धा देशमुख इतर स्वयंसेवक विद्यार्थी यांनी मदत केली.

## ❖ आंतरराष्ट्रीय महिला दिवस :- ८ मार्च २०२१








पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय येथे महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढा च्या स्मरणार्थ आठ मार्च रोजी जागतिक महिला दिन आभासी पद्धतीने साजरा करण्यात आला. या दिवशी कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हूनन लाभलेल्या प्रा. सविता कनसे त्यांनी सखोल अशी माहिती आपल्याला दिली. तसेच या दिनी महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. शितल सोनूकले यांनीसुद्धा महिला दिनावर आपले मत व्यक्त केले व विद्यार्थिनींना व्यक्तिगत जीवनात यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. देशमुख यांनी सुद्धा महिला दिन का साजरा करण्यात येतो याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक नितेश चौधरी व प्राध्यापिका श्रद्धा देशमुख यांनी अथक परिश्रम घेतले..


## ❖ महात्मा जोतिबा फ़ुले जयंती - ११ एप्रिल २०२१







❖ पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती येथे ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले जयंती आभासी पद्धतीने साजरी करण्यात आली. समताधिष्ठित, समाजाच्या निर्मितीमध्ये महात्मा फुले यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी असल्याचे सर्वमान्य आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य मा. प्रमोद डी. देशमुख यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्वीकारून महात्मा ज्योतिराव फुले यांच्या संपूर्ण कार्यावर प्रकाश टाकला आणि इतर काही विद्यार्थ्यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन हे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केले. तसेच कार्यकारी अधिकारी प्राध्यापक नितिन चौधरी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

## ❖ बाबासाहेब आंबेडकर जयंती- १४ एप्रिल २०२१



# पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयत आंबेडकर जयंती साजरी

**प्रतिनिधी/ १७ एप्रिल**

**अमरावती :** स्थानिक पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक, विद्यार्थी व विद्यार्थी स्पर्धा परीक्षा केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीउत्स्व कोरोना पार्श्वभूमीवर ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला.


कु. तनिषा पिंपोळे हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक कु. निकिता ठोसरे या विद्यार्थिनीने केले. कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य पी. डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व उपप्राचार्य डॉ. आय. एस. ठाकरे यांचे प्रमुख उपस्थितीत जयंत्युत्सव संपन्न झाला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आय. एस. ठाकरे यांनी डॉ. बाबासाहेबांच्या विविध कार्यावर प्रकाश टाकतांना प्रज्ञा शील व करुणाशील या गुणांचा अंगीकार करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. त्याचप्रमणे बाबासाहेबांनी लिहिलेल्या ग्रंथांनी विविध क्षेत्रात क्रांती घडऊन आणण्याचे अमुलाग्र कार्य केले व ज्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या जीवनावर प्रकाश टाकला त्यांचे कौतुक सुद्धा केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य पी. डी. देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना शिक्षण क्षेत्रात डॉ. भाऊसाहेब देशमुख यांचे जसे मोलाचे योगदान आहे त्याचप्रमाणे भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यात डॉ. बाबासाहेबांचे मोलाचे योगदान आहे असे संबोधले. तसेच परदेशात उच्च शिक्षण घेऊन सुद्धा आपल्या मातृभूमीशी नाळ कायम ठेऊन सामाजिक सलोखा राखण्याचे व गोरगरीब यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देऊन समतोल विकास साधण्याचे महत्वपूर्ण कार्य बाबासाहेबांनी केले. यावेळी महाविद्यालायाचे विद्यार्थी वैष्णवी आंबेडकर, गौरी घाटे, रीदा खान, टीना पाटील, श्रेया गायकवाड व विनय तायडे यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेबांच्या विविध गुणविशेषांचा विशेष उल्लेख केला व त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रशांत इंगळे या विद्यार्थ्याने केले. सदर कार्यक्रम हा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक प्रा. नितेश चौधरी व प्रा. श्रद्धा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थितीत होते.





❖ पी. आर. पोटे. पाटील कृषि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थी स्पर्धा परीक्षा केंद्र यांचे संयुक्त विद्यमाने

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव करोना पार्श्वभूमीवर ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी तनिषा पिंकोडे तर प्रास्ताविक निकिता ठोसरे हिने केले. प्राचार्य मा. प्रमोद डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पाडण्यात आला. कार्यक्रमांमध्ये बऱ्याच विद्यार्थ्यांनी डॉक्टर बाबासाहेबांच्या जीवनावर प्रकाश टाकला. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आय. एस. ठाकरे यांनी डॉक्टर बाबासाहेबांच्या विविध कार्यावर प्रकाश टाकतांना प्रज्ञा शील व करुणा शील या गुणांचा अंगीकार करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. सदर कार्यक्रम हा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक प्राध्यापक नितेश चौधरी व प्राध्यापिका श्रद्धा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला . कार्यक्रमात विद्यार्थी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

❖ **महाराष्ट्र दिन :- ०१ एप्रिल २०२१**





❖ महाराष्ट्र दिन हा महाराष्ट्र राज्याची निर्मिती दिवस म्हणून पी. आर. पोटे पाटील कृषि महाविद्यालय अमरावती येथे १ मे रोजी आभासी पद्धतीने साजरा करण्यात आला. हा दिवस मराठी माणसे मोठ्या उत्साहाने साजरा करतात. महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी बलिदान दिलेल्या १०६ हुतात्म्यांचे स्मरण या दिवशी केले जाते. तसेच १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणूनही ओळखला जातो .कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. प्रमोद डी. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना या दिवसाचे महत्त्व पटवून दिले तसेच काही विद्यार्थ्यांनी सुद्धा या दिवशी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. नितेश चौधरी व प्रा. कु. श्रद्धा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

## ❖ जागतिक मधमाशी दिवस - २० मे २०२१






**पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयात**


# जागतिक मधमाशी दिन साजरा

**प्रतिनिधी/ २२ मे**

**अमरावती :** पर्यावरण संतुलन व शेतीपूरक उपयोगाच्या दृष्टीने तसेच त्या अनुषंगाने पिक उत्पादन वाढीसाठी मधमाशी पालन व्यवसाय एक फायदेशीर व्यवसाय आहे. तसेच आज मधमाशीचे प्रमाण कमी होत चालले आहे त्याचे मुख्य कारण व आजचा हा कर्यक्रम आयोजित करण्यामागचा मुख्य हेतू नेमका काय असे मत कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक तथा श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाचे कीटकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. समीर लांडे यांनी पी.आर पोटे पाटील कृषी महाविद्यालयात कीटकशास्त्र व विस्तार शिक्षण विभागाने ऑनलाईन पद्धतीने आयोजित जागतिक मधमाशी दिन कार्यक्रमात व्यक्त केले.

तसेच माधमाशी जिवनक्रम व संगोपन या विषयी तंत्रशुद्ध माहिती दिली. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य पी. डी. देशमुख यांनी महाविद्यालयामार्फत राबविण्यात येत असलेले विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमाबाबत माहिती देतांना मधमाशी संगोपन करणे काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आय. एस. ठाकरे यांनी मधमाशी दिनाचे महत्व व आजचा कार्यक्रम आयोजित करण्यामागचे मुख्य कारण विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक प्राध्यापक निलेश बंडाळे यांनी केले.

कार्याक्रमचे सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या कीटकशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका डॉ. अर्चना बेलसरे यांनी करतांनाच प्रमुख मार्गदर्शक डॉ. समीर लांडे यांच्या कार्याचा परिचय करून दिला. आभारप्रदर्शन महाविद्यालयातील कृषी विस्तार विभागाच्या प्राध्यापिका कु. श्रद्धा देशमुख यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रध्यापकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येत आभासी पद्धतीने उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष प्रविण पोटे पाटील यांनी कार्यक्रम आयोजनासाठी शुभेच्छा देतांनाच आयोजकांचे कौतुक केले.




❖ पर्यावरण संतुलन व शेतीपूरक उपयोगाच्या दृष्टीने पी आर पोटे पाटील कृषि महाविद्यालयात कीटकशास्त्र व विस्तार शिक्षण विभागाने ऑनलाईन पद्धतीने जागतिक मधमाशी दिन आयोजित केलेला होता. या कार्यक्रमांमध्ये श्री. शिवाजी कृषी महाविद्यालयाचे कीटकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉक्टर समीर लांडे यांनी मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या कीटकशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका डॉ. अर्चना बेलसरे आणि आभार प्रदर्शन प्राध्यापिका श्रद्धा देशमुख यांनी केले. या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने आभासी पद्धतीने उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष मा. प्रवीण पोटे पाटील यांनी कार्यक्रम आयोजनासाठी शुभेच्छा देतानाच आयोजकांचे कौतुक केले.